MHSN150011142023

( शांताबाई धोंडीराम कदम विरुध्द आप्पासाो यशवंत भोसले-२ )

---

विशेष दिवाणी दावा क्रमांक १०४/२०२३ मधील
निशाणी २८ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रमांक २ व ३ तर्फे प्रस्तुत प्रकरण कामी त्यांचे विरुध्द "विना म्हणणे" सुनावणीबाबत पारीत झालेला आदेश रद्द होऊन, म्हणणे अभिलेखावर दाखल करणेबाबत केला आहे.

२. अर्ज व वादी हिचे म्हणणे वाचले. अभिलेख व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन करता असे स्पष्ट होते की, दिनांक २७/०६/२०२३ रोजी वादी हिने प्रस्तुत प्रकरण दाखल केले आहे. तदनंतर, प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांना समन्स प्राप्त झाल्यानंतर, प्रस्तुत प्रतिवादी दिनांक ०४/१२/२०२३ रोजी विधीज्ञ मार्फत (निशाणी २४) प्रस्तुत प्रकरणकामी उपस्थित झाले आहेत. परंतु, प्रस्तुत प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत कैफियत दाखल केली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द दिनांक ०५/०२/२०२४ रोजी प्रतिवादी क्रमांक २ व ३ याचे विरुध्द "विना कैफियत/ म्हणणे" सुनावणीबाबत आदेश पारीत करण्यात आला आहे. तदनंतर, दिनांक २९/०२/२०२४ रोजी प्रस्तुत प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला असून, अर्जासोबत तुर्तातूर्त ताकीद अर्जास लेखी म्हणणे दाखल केले आहे.

४. वादींतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदवला असून, अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे. वैकल्पिकरित्या वादी हिने अर्ज खर्चासह मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

५. उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक २ व ३ विरुध्द पारीत झालेला “विना म्हणणे” सुनावणीचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांना प्रस्तुत प्रकरणाकामी बचाव उपस्थित करणेची संधी उपलब्ध करुन देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे वादी हिचे कोणतेही नुकसान संभवत नाही. अद्याप प्रस्तुत प्रकरणामध्ये वादींतर्फे पुरावा नोंदविण्यात आलेला नाही अथवा प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप प्रभावी/परिणामकारक सुनावणी प्रक्रियेस प्रारंभ झाली नाही. तसेच, प्रतिवादी क्रमांक १ ते ३ विरुध्द तुर्तातूर्त मनाई अर्ज प्रलंबित आहे. प्रस्तुत प्रतिवादी तर्फे सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे. सदर विलंबापोटी प्रतिवादी यांचेकडून खर्च आकारण्यात येऊन सदर खर्चाची रक्कम वादी यांना देणे उचित होईल. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज र.रु.२००/- (दोनशे रुपये मात्र) खर्च आकारण्यात येऊन मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांचे विरुध्द पारीत करण्यात आलेले “विना म्हणणे” सुनावणीचा आदेश रद्द करण्यात आले व प्रतिवादी क्रमांक २ व ३ तर्फे तुर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे अभिलेखावर दाखल करण्यात येते.

३. प्रतिवादी यांनी पुढील तारीख अथवा तत्पूर्वी वादी हिस खर्चाची रक्कम अदा करावी.

SHINDE SUDHIR NARHARIRAO
Digitally signed by SHINDE SUDHIR NARHARIRAO
Date: 2024.03.13 17:38:03 +0530

विटा. (सुधीर न. शिंदे)
दिनांकः- ११/०३/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : S. P. Pethkar.
Court : Civil Judge Senior Division, Vita.
Judgment/Order signed by the Presiding Officer on : 11/03/2024.
Judgment/Order uploaded on : 16/03/2024.